# करुणा

- **किर्ती रेगे** (ओरलँडो, फ्लोरिडा)

'संभवामी युगे युगे' ...

भगवान श्रीकृष्ण म्हणाले
परत  पृथ्वीवर  जाण्याचे क्षण आले
जे जे गेल्या शतकांमध्ये झाले
ते ते आतां पाहिजेच निस्तरले

पण हे जग किती मोठे
नानाविध लोक, नानाविध संस्कृती
कसे समजावे त्यांसी
जे समजतील त्यांचे मन मोठे

दशावतार मी पूर्वी केले
पण आतां ते दिवस गेले
आजही कौरव, पांडव झाले
पण ते तांत्रिक भाषा बोले

जी शस्त्र  मिळतील ती
दिसती सम सुदर्शन चक्र
आणि हाणतील जे जे वक्र
हीच "करुणा" देवो प्राणीमात्र

***